Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 15 October 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १५ ऑक्टोबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

केंद्रीय निवडणूक आयोग आज महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करणार आहे. आज दुपारी साडे तीन वाजता यासंदर्भात पत्रकार परिषद घेणार असल्याचं आयोगानं कळवलं आहे.

दरम्यान, आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काल दिल्लीत काँग्रेसची बैठक झाली. महाविकास आघाडी म्हणून ही निवडणूक लढवणार असल्याचं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितलं. महाराष्ट्र भाजपाच्या कोअर समितीची देखील काल बैठक झाली. या बैठकीला गृहमंत्री अमित शहा, जे पी नड्डा उपस्थित होते. विधानसभेच्या १५० ते १६० जागा लढवण्यावर, तसंच मित्रपक्षांबरोबर जागा वाटपाबाबत यावेळी चर्चा झाली.

****

राज्यपाल नामनियुक्त सात विधान परिषद सदस्यांचा आज शपथविधी होणार आहे. विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे या सदस्यांना शपथ देतील. चित्रा वाघ, विक्रांत पाटील, धर्मगुरू बाबुसिंग महाराज राठोड, पंकज भुजबळ, इद्रिस इलियास नाईकवाडी, हेमंत पाटील आणि मनीषा कायंदे या सात सदस्यांची राज्यपालांकडून विधान परिषदेवर नियुक्ती करण्यात आली आहे.

****

भारताचे अकरावे राष्ट्रपती आणि मिसाईल मॅन अशी ओळख असणारे डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांची आज जयंती. हा दिवस जागतिक विद्यार्थी दिन आणि जागतिक वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अब्दुल कलाम यांना आदरांजली वाहिली आहे. अब्दुल कलाम यांची दूरदृष्टी आणि विचार विकसित भारताच्या संकल्पपूर्तीमध्ये महत्वाचं योगदान देत असल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं आंतरराष्ट्रीय दूरसंचार महासंघ जागतिक दूरसंचार मानकीकरण परिषद २०२४ चं उद्घाटन झालं. या कार्यक्रमादरम्यान यावर्षीच्या आठव्या इंडिया मोबाईल काँग्रेस २०२४ चं ही उद्घाटन होणार आहे.

****

राष्ट्रीय जल पुरस्कारांची घोषणा काल करण्यात आली. या पुरस्कारांमध्ये पहिला पुरस्कार ओडिसाला, द्वितीय पुरस्कार उत्तर प्रदेशला तर गुजरात आणि पुदुचेरी यांना तिसरा पुरस्कार विभागून देण्यात आला. पुरस्कारांचं वितरण येत्या २२ तारखेला नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे. राष्ट्रीय जलपुरस्कारांमधे महाराष्ट्राला विविध विभागात मिळून पाच पुरस्कार जाहीर झाले आहेत.

****

इथेनॉल जैवइंधनाचे देशभरात ४०० पंप सुरु झाले असल्याची माहिती, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीजने नवी दिल्ली इथं आयोजित जैव इंधन शिखर परिषदेत ते बोलत होते. इथेनॉल आणि गॅस या दोन्ही इंधनावर चालू शकतील अशी वाहनं लौकरच बाजारात आणण्याचा सरकारचा विचार असल्याचं गडकरी यांनी सांगितलं.

****

नाशिक जिल्ह्यात निफाड तालुक्यातल्या कांद्याची बाजारपेठ असलेल्या पिंपळगाव बसवंत शहराला अखेरीस नगर परिषदेचा दर्जा देण्यात आला आहे. राज्य शासनाच्या नगरविकास विभागाच्या वतीने या संदर्भात काल अधिसूचना जारी करण्यात आली. त्यामुळे इथली ग्रामपंचायत बरखास्त करून आता नगर परिषदेचा दर्जा मिळणार आहे.

****

गडचिरोली जिल्ह्यातल्या भामरागड तालुक्यात सक्रीय जहाल नक्षलवादी दाम्पत्याने काल केंद्रीय राखीव दल आणि जिल्हा पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं. वरुण राजा मुचाकी उर्फ रेंगू आणि रोशनी विजया वाच्छामी अशी त्यांची नावं आहेत. त्यांच्यावर अनुक्रमे आठ आणि दोन लाखाचं बक्षिस होतं. नक्षलवाद्यांनी हिंसेचा मार्ग सोडून मुख्य प्रवाहात येण्याचं आवाहन पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी केलं आहे.

****

नांदेड जिल्ह्यातल्या मुदखेड पंचायत समितीला आयएसओ मानांकन प्राप्त झालं आहे. मुदखेड पंचायत समितीने केंद्र तसंच राज्य शासनाच्या महत्त्वाच्या उपक्रमात प्रभावी अंमलबजावणी, परिणामकारक पर्यवेक्षण, लाभार्थ्यांना तत्पर सेवा, झिरो पेंडन्सी अशा विविध बाबीवर विशेष लक्ष केंद्रीत केलं आहे. सामान्य प्रशासन, शिक्षण, पंचायत, कृषी आणि पशुसंवर्धन, आरोग्य, महिला आणि बालविकास, रोजगार, स्वच्छता आणि पाणी पुरवठा आदी विभागामध्ये केलेल्या प्रभावी कामगिरीची दखल या मानांकनावेळी घेण्यात आली. आयएसओ मानांकन मिळवणारी ही नांदेड जिल्ह्यातली तिसरी पंचायत समिती ठरली आहे.

****

नाशिक जिल्ह्यातल्या इगतपुरी विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे आमदार हिरामण खोसकर यांनी काल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. पक्षाचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचं स्वागत केलं.

दरम्यान, सातारा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संजीवराजे निंबाळकर आणि फलटणचे आमदार दीपक चव्हाण यांनी काल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला.

****

ठाणे जिल्ह्यात किन्हवलीच्या शहा चंदुलाल सरुपचंद विद्यालयाचा संचालक तथा सह सचिव चंद्रकांत हरिभाऊ धानके याला एक लाख दहा हजार रुपयांची लाच स्वीकारताना काल अटक करण्यात आली. शालेय कर्मचाऱ्याची रोखलेली दोन वर्षांची वेतनवाढ पूर्ववत करण्यासाठी त्याने ही लाच मागितली होती.

****